20/1/2023

## 2) मानवी ~~विकास~~ संसाधन विकासासाठी काम करणाऱ्या शासकीय व निमशासकीय संस्था

### 1) NCERT :-

- National council of Educational Research and Training, New Delhi
- राष्ट्रीय शैक्षणिक ~~अ~~ नियोजन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली
- रजिस्ट्रेशन - NCERT ACT - 21 (1960)
- संस्था स्थापनेची जाहीर केलेली तारीख - 27 जुलै 1961
- ~~केंद्र~~ प्रत्यक्ष स्थापना - 1 sep 1961 अरविंद मार्ग, दिल्ली
- प्रस्तावना :- केंद्र शासनाने शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी शिखर संस्था म्हणून NCERT ची स्थापना केली तर केंद्र आणि राज्यामध्ये ॲकॅडमीक विंग म्हणून या संस्थेची स्थापना केला. तर प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठीची मोडेल एजन्सी म्हणून या NCERT ची स्थापना करण्यात आली. ही संस्था 19 विभागात काम करत असून ~~1A~~ केंद्रसरकारने 1 Aug 1995 रोजी NCERT ची एक उपसंस्था म्हणून NCTE ची स्थापना केली. National counil for Teacher Education (राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद) प्रशासकीय सोयी साठी तीन विभागातून काम करते. 1) सर्वसाधारण विभाग, 2) कार्यकारी मंडळ, 3) स्थायी समिती या विभागातून कार्य करते.
- रचना :-

अध्यक्ष - केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री / केंद्रीय शिक्षणमंत्री
उपाध्यक्ष - केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री
सदस्य - 1) सर्व राज्याचे शिक्षणमंत्री
2) केंद्रशासित प्रदेशाचे शिक्षणमंत्री
3) दोन शिक्षणतज्ञ
4) UGC चे अध्यक्ष
5) CBSC चे अध्यक्ष
6) RVS चे अध्यक्ष
7) निती आयोगाचे सदस्य

Scanned with OKEN Scanner

NCERT

- प्रकाशन कार्यालये :-

1) अहमदाबाद
2) कलकत्ता
3) बेंगलोर

- मासिक :-

1) The Primary Teacher
2) The science Teacher
3) The Journal of India

- NCERT अंतर्गत काम करणाऱ्या संस्था :-

1) CIET - केंद्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था

- या संस्थेची स्थापना 1984 मध्ये NCERT अंतर्गत करण्यात आलेली असून ही संस्था आकाशवाणी, रेडिओ, दूरदर्शन व इतर काही चॅनलवरून शैक्षणिक प्रसार व प्रचार करते.

2) पं. सुंदरलाल शर्मा :-

- भोपाळ (मध्यप्रदेश)
- NCERT अंतर्गत या संस्थेची स्थापना 1997 मध्ये व्यावसायिक शिक्षणाचा विकास करण्यासाठी स्थापन केलेली ही संस्था आहे.

3) विभागीय प्रशिक्षण संस्था / महाविद्यालये :-

NCERT च्या कार्याचा विस्तार करण्यासाठी या विभागीय प्रशिक्षण संस्था स्थापना करण्यात आली. या विभागीय प्रशिक्षण संस्था भारतात 5 ठिकाणी कार्यरत असून त्या विविध विभागासाठी स्थापन करण्यात आल्या आहेत.

1) उत्तर - अजमेर (राजस्थान)
2) पश्चिम - भोपाळ (मध्य प्रदेश)
3) दक्षिण - ~~बेंगलोर~~ म्हैसूर (कर्नाटक)
4) पूर्व - भुवनेश्वर (ओडिसा)
5) उत्तर पूर्व - शिलांग (मेघालय)

Scanned with OKEN Scanner

- NCERT चे कार्य :-

1) संशोधना विषयीचे कार्य :-

1) भारतात संशोधन कार्याला चालना देण्यासाठी नावा प्रमाणे ही संस्था विविध शिबीराचे आयोजन करते व जनरल चालू करते.

2) शिक्षक प्रशिक्षणासाठी कार्य :-

1) संपूर्ण भारतातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन प्राध्यपकासाठी कमी व जास्त कालावधीचे सेवा पूर्व व सेवा अंतर्गत प्रशिक्षणाची सोय करते. त्याचा अभ्यासक्रम तयार करते.

3) शालेय अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करणे :-

संपूर्ण भारतातील CBSC शाळा, इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, नॅशनल स्कूल, केंद्रीय विद्यार्थी संघटन यासारख्या शैक्षणिक संस्थाच्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करून प्रकाशित करण्याची जबाबदारी NCERT ची असते.

4) शालेय स्तरावर विविध स्पर्धा परिक्षाचे आयोजन :-

MTS, NTS, नवोदय, ऑलम्पियाड, या सारख्या स्पर्धा परिक्षांचे आयोजन करणे, पेपर काढणे, परिक्षा घेणे, परिक्षांच्या निकाल जाहिर करणे यासाठी ही संस्था कार्यरत असते.

5) विस्तार सेवा केंद्र :-

- NCERT ही संस्था शासकीय शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यासाठी विविध विस्तार सेवा केंद्राचे आयोजन करते.

NUEPA - Delhi

24/1/2023

25/1/2023

National University Educational Planning and Administration.

राष्ट्रीय ~~विद्यापीठ~~ शैक्षणिक नियोजन व प्रशासन विद्यापीठ, दिल्ली.

स्थापना, - 1961 राष्ट्रीय आशियाई शैक्षणिक नियोजन प्रशासन महाविद्यालय

1969 राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन स्टाफ कॉलेज.

1979 राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था

2006 राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन विद्यापीठ

- केंद्र सरकारने स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा. (5)

रचना:-

I) अध्यक्ष - केंद्रीय मानवसंसाधन विकासमंत्री / केंद्रीय शिक्षणमंत्री

II) उपाध्यक्ष - NUEPA कुलगुरू

III) सदस्य - 1) सचिव उच्च शिक्षण विभाग भारतसरकार
2) सचिव शालेय शिक्षण विभाग भारतसरकार
3) साक्षरता विभाग भारतसरकार
4) विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष
5) संचालक NCERT
6) नियोजन आयोगाचे सदस्य
7) राष्ट्रपतीद्वारे नियुक्त शिक्षण तज्ञ

IV) इतर सदस्य - 1) सचिव - तांत्रिक शिक्षण } महाराष्ट्र
2) सचिव - उच्च शिक्षण }
3) सचिव - उच्च शिक्षण - मध्य
4) सचिव - शालेय शिक्षण - मेघालय
5) सचिव - शालेय शिक्षण - जम्मू & काश्मीर
6) सचिव - उच्च शिक्षण - कर्नाटक

विभाग 10 - 1) शैक्षणिक नियोजन
2) प्रशासन विभाग
3) वित्त विभाग
4) धोरण विभाग
5) शाळा व अनौपचारिक शिक्षण विभाग
6) व्यावसायिक शिक्षण / कलात्मक विभाग
7) ~~कलात्मक विभाग~~ मूलतत्वे विभाग
8) आंतरराष्ट्रीय सहकारी विभाग
9) सर्व समावेशक विभाग
10) शैक्षणिक व्यवस्थापन व माहिती व्यवस्थापन

मासिक - 1) Journal Educational planning and Administration.
2) परिप्रेक्ष्य - हिंदी
3) ANTRIEP - Asian Network of Training and Research Institution in Educational and planning

कार्य :-
1) शिक्षण प्रशासन
2) शिक्षण प्रशिक्षण
3) संशोधन
4) प्रकाशन
5) विस्तार सेवा
6) अभ्यासक्रम
7) सल्लागार
8) शासकीय अधिकार प्रशिक्षण

3) विद्यापीठ अनुदान आयोग - (UGC - University Grants Commission)

भारतात प्राचीन काळापासून शिक्षणाला अन्य साधारण महत्व देण्यात आले. जगातील पहिले विद्यापीठ म्हणून तक्षशिला ओळखतात. तेथून पुढे अनेक विद्यापीठ स्थापन झाली. ब्रिटिशांनी लंडन विद्यापीठाच्या धरतीवर भारतात उच्च शिक्षण देण्यासाठी विद्यापीठ स्थापन केली त्या विद्यापीठावर नियंत्रण ठेवणारी एक संस्था असावी म्हणून 28 डिसेंबर 1956 रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करण्यात आली. हे विद्यापीठ भारतातील सर्व विद्यापीठावर नियंत्रण ठेवून त्यांना आर्थिक मदत करत असे.

- स्थापना - 28 डिसेंबर 1956
- कार्यालय - नवी दिल्ली
- सध्याचे अध्यक्ष - जगदिश कुमार

* विद्यापीठ अनुदानाची पार्श्वभूमी -

1857 मुंबई मद्रास विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. 1887 ला अल्लाबाद विद्यापीठाची स्थापना, 1925 आंतरविद्यापीठीय मंडळाची स्थापना केली 1944 ला सार्जंट अहवालाच्या शिफारशीवरून विद्यापीठ अनुदान समितीची स्थापना केली 1945 अनुदान समितीची नियंत्रण अलिगड, बनारस, दिल्ली यांच्याशी संबंधित
- 1948 विद्यापीठ आयोगाची स्थापना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन या आयोगाने सर्वप्रथम अनुदान आयोगाची शिफारस केली.
- 1953 तत्कालीन भारताचे शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी विद्यापीठ आयोगाचे उद्घाटन केले.
- 1956 मध्ये संसद कायद्याद्वारे विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करण्यात आली.

Scanned with OKEN Scanner

* विद्यापीठ अनुदान आयोग रचना :-
विद्यापीठ आयोगात 12 सदस्य असुन सफारू समितीने 15 सदस्य असावे घोषित केली.
- अध्यक्ष 1
- उपाध्यक्ष 1
- सदस्य 8-9
या 8-9 पैकी
4 सदस्य - विद्यापीठ क्षेत्रातील असतात.
4-5 सदस्य - इतर क्षेत्रातील असतात.
कार्यकाल -
अध्यक्ष - 5 वर्षे / वय 65
उपाध्यक्ष - 3 वर्षे / 65
सदस्य - 3 वर्षे / 65
सदस्य, उपाध्यक्ष, अध्यक्ष यांना जास्तीतजास्त 2 वेळा पदभार करता येतो.
University Development in India
5 विद्यापीठांचा आदर्श
1) सावित्रीबाई विद्यापीठ, पूणे
2) पंडित जवाहरलाल विद्यापीठ, दिल्ली
3) जाधवपूर विद्यापीठ, कलकत्ता
4) मद्रास विद्यापीठ, मद्रास
5) उस्मान्या विद्यापीठ, हैद्राबाद
भारतातील उत्कृष्ट केंद्र म्हणून 12 विद्यापीठांना जाहीर केले.
NAC - नैक
कार्यालय - बेंगलूर
- information liabeey network - अल्लाहबाद
- MST विद्यापीठ - तिरूमलला व्यंकटेश विद्यापीठ, त्या
सावित्रीबाई फुले पूणे येथे 1988 मध्ये भूगोलशास्त्र व इतर खगोलशास्त्रीय स्थापना करण्यात आली.
कार्ये :-
1) विद्यापीठाला मान्यता देण्याचा प्रस्ताव केंद्रसरकारकडे सादर करण्यात आला.
2) विद्यापीठांना आर्थिक मदत मिळवून देणे.
3) सर्व विद्यापीठाचे व महाविद्यालयाचे पुर्नमूल्यांकन करणे.
4) केंद्र सरकारला विद्यापीठ स्थापन करण्याची शिफारस करणे.

Scanned with OKEN Scanner

5) विद्यापीठकडून पदव्यांची पडताळणी
6) उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम - पाठ्यक्रम तयार करणे.
7) माहिती तंत्रज्ञान, अणू ऊर्जा, पर्यावरण शिक्षण, माहिती अधिकार कायदा यासारख्या शिक्षणाला महत्व देणे.

## * मुक्त विद्यापीठ :-

जगात २० व्या शतकात ज्ञानाचा विस्फोट झाला. वेगवेगळ्या विषयाची निर्मिती झाली हजारो अभ्यासक्रम तयार करण्यात आल्या. शिक्षणाच्या संधी सर्वांनाच खुल्या झाल्या. त्याचाच एक भाग म्हणून 14 NOV 1966 रोजी इंदिरा गांधींनी गरीब दुर्बल अशिक्षित निरक्षर यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून मुक्त विद्यापीठ स्थापनेची गरज व्यक्त केली. त्याचाच भाग म्हणून 1969 इंग्लंडमध्ये मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. यांचे जनक मॉकल यंग असून तत्कालीन पंतप्रधान हेरॉल्ड विल्सन यांनी मुक्त विद्यापीठ स्थापन केली. म्हणून इंग्लंडला मुक्त विद्यापीठाची जननी असे म्हणतात. त्यानंतर विविध देशामध्ये मुक्त विद्यापीठ स्थापन झाली. 1973 - इराण, 1974 - इराक, 1975 पाकिस्तान येथे मुक्त विद्यापीठ स्थापन झाले.

- भारतातील मुक्त विद्यापीठांची स्थापना :-

1) पहिले मुक्त विद्यापीठ - अन्नामलाई मुक्त विद्यापीठ (हैद्राबाद - तेलंगणा)(स) आंध्रप्रदेश - सु
स्थापना - 26 ऑगस्ट 1982

2) इंदिरा गांधी ~~इंटर~~ आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, दिल्ली
स्थापना - 20 सप्टेंबर 1985

3) कोटा मुक्त विद्यापीठ (राजस्थान) वर्धमान महावीर मुक्त विद्यापीठ
स्थापना - 1987

4) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
स्थापना - 1 जुलै 1989

5) कर्नाटक मुक्त विद्यापीठ, म्हैसूर
स्थापना - 1995

6) भोज मुक्त विद्यापीठ (भोज, म.प्र)
स्थापना - ~~1992~~ 1992

Scanned with OKEN Scanner

7) डॉ. बाबासाहेब मुक्त विद्यापीठ, अहमदाबाद
स्थापना - 1992
8) नेताजी सुभाषचंद्र बोस मुक्त विद्यापीठ, (कलकत्ता प.ब)
स्थापना - 1997
9) राजर्षी टंडन मुक्त विद्यापीठ, (अलाहबाद, उ.प्र)
स्थापना - 1999
10) कृष्णकांत मुक्त विद्यापीठ, (गुहावटी आसाम)
स्थापना -
11) सुंदरलाल शर्मा मुक्त विद्यापीठ (बिलासपूर, छत्तीसगड)
स्थापना - 2005
12) तमिळनाडू मुक्त विद्यापीठ, (चेन्नई)
स्थापना - 2002
13) उत्तराखंड मुक्त विद्यापीठ, हल्दवानी, नैनिताल, उत्तराखंड

1) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ :-
स्थापना - 20 सप्टें 1985 (तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी)
- इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ कायदा 1985 संसदेच्या या कायद्याद्वारे या विद्यापीठाची स्थापना
- या मुक्त विद्यापीठाला केंद्रिय मानव संसाधन विकास मंत्रालय मध्यवर्ती संस्था म्हणून ओळखले जाते.
- इ.स. 2010 मध्ये युनेस्को या संघटनेने जगातील सर्वात मोठे विद्यापीठ म्हणून मान्यता दिली.
- ॲवार्ड ऑफ एक्सेलन्स / एक्सलेन्स ऑफ ॲवार्ड अशा दोन पुरस्काराने गौरविण्यात आले.
- या मुक्त विद्यापीठाचे भारतात आणि 36 देशामध्ये अभ्यासक्रम सुरु आहेत. प्रादेशिक केंद्र - 67, आंतरराष्ट्रीय केंद्र - 67 अभ्यासक्रम - 490
36,000 मार्गदर्शक शिक्षक
- दूरदर्शन वरून ज्ञानदर्शन नावाचा कार्यक्रम सादर करते. आकाशवाणी वरुन ज्ञानवाणी नावाचा कार्यक्रम सादर करते.

- सैनिकांना शिकण्याची सोय व्हावी म्हणून ज्ञानदीप भूसेना, आकाशदीप हवाई सेना, सागरदीप नौसेना या ३ सेनेसाठी या नावाने अभ्यासक्रम चालू केला.

2) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ :-

इंदिरा गांधी मु. वि. धरतीवर भारतात / महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण म. मु. वि. कायदा 20XX हा 1989 मध्ये तयार करून 1 जुलै 1989 मध्ये स्थापना करण्यात आली. (नाशिक) यांचे विभागीय कार्यालये 8 ठिकाणी आहेत. महाराष्ट्रातील सर्वात श्रीमंत विद्यापीठ म्हणून यशवंतराव चव्हाण या विद्यापीठाला पाहिले जात. काही नाविन्यपूर्ण उपक्रम हे वि. राबवत असून त्यामध्ये दयी प्रशिक्षण, आशा कार्यक्रम हे कार्यक्रम सुरु केले.

वैशिष्ट्ये / उद्देश :-

1) निरीक्षर आणि अज्ञान लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे
2) गरीब दुर्बळ डोंगराळ आणि आदिवासी भागात राहणाऱ्या लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.
3) शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे.
4) कमी खर्चात, वेळात पदवी आणि पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणे.
5) शिक्षण न घेऊ शकणाऱ्यांना संधी उपलब्ध करून देणे.

3) IMC :- भारतीय वैद्यकीय परिषद (Indian medical councicil)

भारतात दर्जेदार वैद्यकीय शिक्षण मिळावे या हेतूने Indian medical councicil Act 1933 या कायद्यानुसार 1934 मध्ये या भारतीय वैद्यकीय परिषद स्थापना करण्यात आली. या परिषदेमध्ये 1964, 1971, 2001 या वर्षी 1933 च्या कायद्यात सुधारणा केली. आणि परिषदेचा दर्जा वाढवण्याचा प्रयत्न केला.

- स्थापना - 1934
- कार्यालय - दिल्ली
- मंत्रालय - आरोग्य मंत्रालय
- सध्याचे अध्यक्ष - डॉ. सुरेशचंद्र शर्मा
- सदस्य - 1) प्रत्येक राज्यातून 1 सदस्य
  2) वै. म. सिनेट सदस्य
  3) आरोग्य विद्यापीठातील मुख्य प्राध्यापक
  4) अध्यक्ष व उपाध्यक्ष या परिषदेचे यांची निवड

Scanned with OKEN Scanner

17/12/2023

निवड झालेले सदस्य करतात.

उद्देश :-

1) वैद्यकीय शिक्षणाचा दर्जेदार अभ्यासक्रम तयार करून त्यात सुसूत्रीकरण करणे.

कार्ये :-

1) ~~कक~~ वैद्यकीय शिक्षणाचा अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पुस्तक तयार करणे.

2) वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारला शिफारस करणे

3) वैद्यकीय महाविद्यालय जागा वाढवण्यासाठी शिफारस करणे.

4) वैद्यकीय पदवी प्राप्त विद्यार्थ्यांची नोंदी करून ठेवणे.

5) ~~परदेशात मध्ये~~ वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करून वैद्यकीय क्षेत्रात व्यवसाय/ नोकरी करण्यासाठी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना परवानगी देणे.

6) ~~वैद्यकीय~~ शिक्षणाबाबत वेळोवेळी शिफारस करणे.

—x—x—x—x—x—x—x—